सा. प्र. विभाग, कार्या.२१, २१-अ व २१ रोख शाखा या कार्यासनांना वाटप केलेल्या ६०० चौ.फूट जागेच्या नुतनीकरणासाठी स्थापत्य कामे व फर्निचर इ. कामासाठी, रु. ६,३८,३५९/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक क्र. एसएम-१८८१ यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः कादुअं-२०१८/प्र.क्र.१२१/२०१८/२१-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५ मार्च, २०१९

<u>वाचा</u>: १. सा.प्र.विभाग, शासन निर्णय क्र. शाकाजा-१११२/प्र.क्र. ६४/२०१७/२२, दि. ०५/०२/२०१८
२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.इशवि/प्रशा/द./१३२५३, दि.१०/१२/२०१८

शासन निर्णय:

मंत्रालय मुख्य इमारतीतील मॅको बँकेच्या जागे शेजारील ६०० चौ.फूट जागा सामान्य प्रशासन विभाग, कार्या-२१, २१-अ व २१ रोख शाखा या कार्यासनांना अभिलेख जतन, भांडार व्यवस्था व इतर सामग्री साठविण्यासाठी वाटप करण्यात आली आहे. सदर जागेचे नुतनीकरण करण्याकरिता स्थापत्य कामे व फर्निचर इ. कामासाठी, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग (सा.बां.वि.), मुंबई यांनी तयार केलेला जागेच्या रचनेचा नकाशा व रु. ६,३८,३५९/- (रुपये सहा लाख अडोतीस हजार तीनशे एकोणसाठ फक्त) एवढया खर्चाचे अंदाजपत्रक क्रमांक एसएम-१८८१ यास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. त्यानुसार या शासन निर्णयान्वये, मंत्रालय मुख्य इमारतीतील मॅको बँकेच्या जागे शेजारील ६०० चौ.फूट जागा सामान्य प्रशासन विभाग, कार्या-२१, २१-अ व २१-रोख शाखा या कार्यासनांना अभिलेख जतन, भांडार व्यवस्था व इतर सामग्री साठविण्यासाठी वाटप करण्यात आली आहे. सदर जागेमध्ये स्थापत्य कामे व फर्निचर इ. कामासाठी, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग (सा.बां.वि.), मुंबई यांनी तयार केलेला जागेच्या रचनेचा नकाशा व रु. ६,३८,३५९/- (रुपये सहा लाख अडोतीस हजार तीनशे एकोणसाठ फक्त) एवढया खर्चाचे अंदाजपत्रक क्रमांक एसएम १८८१ यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. या प्रयोजनार्थ होणारा खर्च मागणी क्रमांक ए-१" लेखाशिर्ष २०१३-मंत्री परिषद (८००) इतर खर्च (२०१३००५३) -१३ कार्यालयीन खर्च " या लेखाशीर्षाखाली, सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध तरतुदीतून खर्ची टाकण्यात यावा.

४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र. ३०/२०१३ विनियम भाग-२ दि. १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग दोन, अनुक्रमांक ३७, नियम ९० अन्वये, प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१५१८५२८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Namdeo
Kashinath Mali

Digitally signed by Namdeo Kashinath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d3cbafce2e197ab3683c7133deabfac4ef56ca53d2af01b1b3648a21a985c629, serialNumber=1178e48d2f5be414ade2c612247d3db669147cf3ef4acbe3fc4adba8ff18e1d9, cn=Namdeo Kashinath Mali
Date: 2019.03.05 15:22:29 +05'30'

(ना. का. माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,
बांधकाम भवन, दुसरा मजला, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२,नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
७. आहरण व संवितरण अधिकारी, कार्यासन-२१, रोख शाखा, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई-३२.
८. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. उपसचिव (इमारती), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१
११. अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१
१२. अवर सचिव, (कार्यासन व्यय ४/अर्थ-१४/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. कक्ष अधिकारी, कार्यासन-२५, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई-३२
१५. निवड नस्ती (कार्यासन-२१-अ).